## प्रपत्र -३
## प्रवेशाकरिता आवश्यक कागदपत्रांची यादी

### अ ३.१ मागासवर्गीय उमेदवाराच्या आरक्षणाचा दावा करणेकरिता आवश्यक कागदपत्रे

उमेदवाराने केलेल्या मागास प्रवर्गातील आरक्षणाच्या दाव्याच्या (नियम क्र.५.७ मध्ये नमूद केल्यानुसार) पुष्ठ्यर्थ आवश्यक कागदपत्रांचा तपशील खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे आहे.

| अ.क्र. | आरक्षणाचा प्रवर्ग | मागासवर्गाच्या आरक्षणाच्या पुष्ठ्यर्थ आवश्यक कागदपत्रे | कागदपत्रे देणारा प्राधिकारी |
|---|---|---|---|
| १ | अनुसूचित जाती (SC) | १. महाराष्ट्र राज्यामध्ये उमेदवाराची जात अनुसूचित जाती प्रवर्गामधील जात म्हणून मान्यता प्राप्त असल्याचे जातीचे प्रमाणपत्र | महाराष्ट्र राज्यातील कार्यकारी दंडाधिकारी |
| २ | अनुसूचित जमाती (ST) | १. महाराष्ट्र राज्यामध्ये उमेदवाराची जात अनुसूचित जमाती प्रवर्गामधील जात म्हणून मान्यता प्राप्त असल्याचे जातीचे प्रमाणपत्र | महाराष्ट्र राज्यातील कार्यकारी दंडाधिकारी |
| ३ | विमुक्त जाती /भटक्या जमाती (अ) (VJ/ DT(NT-A)) / विशेष मागास प्रवर्ग (SBC) | १. महाराष्ट्र राज्यामध्ये उमेदवाराची जात मागास प्रवर्गा मधील जात म्हणून मान्यता प्राप्त असल्याचे जातीचे प्रमाणपत्र | महाराष्ट्र राज्यातील कार्यकारी दंडाधिकारी |
| | | २. पुढील वर्षी ३१ मार्च पर्यंत वैधता असलेले नॉन क्रिमी लेयर प्रमाणपत्र | उपविभागीय अधिकारी/ उपजिल्हाधिकारी/ जिल्हाधिकारी/ महानगर न्याय दंडाधिकारी |
| ४ | भटक्या जमाती - ब/ क/ ड (NT - B, C, D), इतर मागास वर्गीय (OBC) | १. महाराष्ट्र राज्यामध्ये उमेदवाराची जात/मागास प्रवर्गा मधील जात म्हणून मान्यता प्राप्त असल्याचे जातीचे प्रमाणपत्र | महाराष्ट्र राज्यातील कार्यकारी दंडाधिकारी |
| | | २. पुढील वर्षातील ३१ मार्च पर्यंत वैधता असलेले नॉन क्रिमी लेयर प्रमाणपत्र | उपविभागीय अधिकारी/ उपजिल्हाधिकारी/ जिल्हाधिकारी/ महानगर न्याय दंडाधिकारी |
| ५ | सामाजिक आणि शैक्षणिक दृष्ट्या मागास (SEBC) | १. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचे दि.०७.१२.२०१८ च्या शासन निर्णयासह देण्यात आलेले प्रमाणपत्राचा नमुना. सदर जात प्रमाणपत्राचा मराठी व इंग्रजी नमुना अनुक्रमे पृष्ठ क्र. ५९ व ६० वर देण्यात येत आहे. | महाराष्ट्र राज्यातील कार्यकारी दंडाधिकारी |
| | | २. पुढील वर्षातील ३१ मार्च पर्यंत वैधता असलेले नॉन क्रिमी लेयर प्रमाणपत्र | उपविभागीय अधिकारी/ उपजिल्हाधिकारी/ जिल्हाधिकारी/ महानगर न्याय दंडाधिकारी |
| ६ | खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी | १. सामान्य प्रशासन विभाग यांचे दि.१२.०२.२०१९ च्या शासन निर्णयासह आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाच्या पात्रतेसाठी देण्यात आलेले प्रमाणपत्राचा नमुना. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाच्या पात्रतेच्या प्रमाणपत्राचा मराठी व इंग्रजी नमुना अनुक्रमे पृष्ठ क्र. ६१ व ६२ वर देण्यात येत आहे. | महाराष्ट्र राज्यातील कार्यकारी दंडाधिकारी |
| | | २. पुढील वर्षातील ३१ मार्च पर्यंत वैधता असलेले नॉन क्रिमी लेयर प्रमाणपत्र | उपविभागीय अधिकारी/ उपजिल्हाधिकारी/ जिल्हाधिकारी/ महानगर न्याय दंडाधिकारी |

**अ ३.२ अर्ज स्विकृती केंद्रामध्ये ऑनलाईन प्रवेशअर्ज निश्चिती आणि संबंधित औ.प्र.संस्थामध्ये प्रवेश निश्चित करताना सादर करावयाचे कागदपत्रे:**

| अ.क्र. | उमेदवारांचे प्रकार | सादर करावयाचे कागदपत्रे |
|---|---|---|
| १ | सर्व उमेदवारांकरिता बंधनकारक असणारी कागदपत्रे | १. आधार नोंदणी कार्ड<br>२. भारतीय राष्ट्रीयत्वाचे प्रमाणपत्र *<br>३. माध्यमिक शालांन्त प्रमाणपत्र परिक्षेची (SSC) गुणपत्रिका<br>४. शाळा अथवा महाविद्यालय सोडल्याचे प्रमाणपत्र (अलीकडील शाळा/महाविद्यालय शिक्षण घेतलेले) |
| २ | प्रकार - ब उमेदवार (Type - B Candidate) | १. उमेदवाराचे अधिवास प्रमाणपत्र ** अथवा उमेदवाराची आई अथवा वडील महाराष्ट्र राज्याचे अधिवास असल्याचे प्रमाणपत्र |
| ३ | प्रकार - क उमेदवार (Type - C Candidate) | १. उमेदवाराचे आई/वडील हे केंद्र सरकार/केंद्र सरकारच्या उपक्रमामधील कर्मचारी असल्यास त्यांची महाराष्ट्र राज्यात नियुक्ती झाली आहे असे नमूद केलेले कार्यालय प्रमुखाचे प्रमाणपत्र |
| ४ | प्रकार - ड उमेदवार आणि प्रकार - इ उमेदवार (Type - D and E Candidate) | १. उमेदवाराचे आई/वडील हे महाराष्ट्र राज्य शासन/महाराष्ट्र राज्य शासनाच्या उपक्रमामधील कर्मचारी असल्याचे कार्यालय प्रमुखाचे प्रमाणपत्र |
| ५ | मागास प्रवर्गात मोडणाऱ्या अनुसूचित जाती/ अनुसूचित जमाती | १. मुद्दा अ ३.१ मध्ये नमूदप्रमाणे जाती प्रमाणपत्र |
| ६ | मागास प्रवर्गात मोडणाऱ्या विमुक्त जाती /भटक्या जमाती (अ), (ब), (क), (ड) इ.मा.व./ वि.मा.व. (VJ/ DT/ (A)/ NT(B)/ NT(C) / NT(D)/OBC/ SBC | १. मुद्दा अ-३.१ मध्ये नमूदप्रमाणे जाती प्रमाणपत्र<br>२. पुढील वर्षी ३१ मार्च पर्यंत वैधता असलेले नॉन-क्रिमी-लेयर प्रमाणपत्र |
| ७ | सामाजिक आणि शैक्षणिक दृष्ट्या मागास (SEBC) | १. मुद्दा अ-३.१ मध्ये नमूदप्रमाणे प्रमाणपत्र<br>२. पुढील वर्षी ३१ मार्च पर्यंत वैधता असलेले नॉन-क्रिमी-लेयर प्रमाणपत्र |
| ८ | खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी | १. मुद्दा अ-३.१ मध्ये नमूदप्रमाणे प्रमाणपत्र<br>२. पुढील वर्षी ३१ मार्च पर्यंत वैधता असलेले नॉन-क्रिमी-लेयर प्रमाणपत्र |
| ९ | माजी सैनिक | १. संरक्षण सेवा प्रमाणपत्र<br>२. उमेदवाराचे आई/वडील संरक्षण सेवेत कार्यरत होते व ते महाराष्ट्र राज्याचे अधिवास असल्याचे प्रमाणपत्र |
| १० | संरक्षण सेवेतील कार्यरत व्यक्ती | १. संरक्षण सेवा प्रमाणपत्र<br>२. उमेदवाराचे आई/वडील जे संरक्षण सेवेत कार्यरत होते व महाराष्ट्र राज्याचे अधिवास असल्याचे प्रमाणपत्र |
| ११ | महाराष्ट्र राज्यात अधिवास नसलेले संरक्षण सेवेतील कार्यरत कर्मचारी | १. संरक्षण सेवा प्रमाणपत्र<br>२. उमेदवाराचे आई/वडील संरक्षण सेवेतील कार्यरत व्यक्ती असून सध्या त्यांची नियुक्ती महाराष्ट्र राज्यात झाली असल्याचे कार्यालय प्रमुखाचे प्रमाणपत्र अथवा<br>३. उमेदवाराचे आई/वडील हे संरक्षण सेवेत कार्यरत आहेत आणि ते महाराष्ट्रातील पूर्वीच्या नियुक्तीच्या निवासस्थानात रहात आहेत असे कार्यालय प्रमुखाचे नमूद केलेले प्रमाणपत्र |
| १२ | अपंग उमेदवार (PWD१/ PWD २/PWD ३/PWD ४/ PWD ५) | १. अपंगत्वाचा प्रकार, अपंगत्वाची टक्केवारी, कायम स्वरुपी अपंगत्व याबाबतचा स्पष्ट उल्लेख असलेल्या वैद्यकीय मंडळाचे प्रमाणपत्र |
| १३ | अल्पसंख्यांक उमेदवार | १. धर्माबाबतचे प्रमाणपत्र अथवा उमेदवार मुस्लिम, बौध्द, ख्रिश्चन, शीख, पारशी आणि जैन धर्मात मोडतो ह्याचा उल्लेख असलेले शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र<br>२. उमेदवाराचे अधिवास प्रमाणपत्र ** अथवा उमेदवाराची आई अथवा वडील महाराष्ट्र राज्याचे अधिवास असल्याचे प्रमाणपत्र |

| अ.क्र. | उमेदवारांचे प्रकार | सादर करावयाचे कागदपत्रे |
|---|---|---|
| १४ | तांत्रिक विषय घेतलेले विद्यार्थी | १. तांत्रिक विषयाचा उल्लेख असलेले माध्यमिक शालांन्त परीक्षा प्रमाणपत्र (SSC) |
| **वाढीव गुणांच्या अधिक्यासाठी आवश्यक कागदपत्रे (नियम क्र.८.० अन्वये)** | | |
| १५ | इंटरमिडीएट चित्रकला परीक्षा | १. इंटरमिडीएट चित्रकला श्रेणी परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र |
| १६ | एनसीसी/ एमसीसी/ स्काउट गाईड/सिव्हील डिफेन्स गाईड | १. सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र |
| १७ | क्रिडा | १. सक्षम प्राधिकाऱ्याचे खेळाचे प्रमाणपत्र |
| १८ | बोल्स्टर स्कूल उमेदवार | १. सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र |
| १९ | अनाथाश्रमात वास्तव्य असलेले उमेदवार | १. सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र |
| २० | ग्रामीण शालेय विद्यार्थी | १. माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (SSC) दिलेल्या शाळेचा शाळा सोडल्याच्या प्रमाणपत्रात, शाळा ज्या जागी आहे (शाळेचा पत्ता) त्याचा स्पष्ट उल्लेख असावा.<br>२. उमेदवार जेथून माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (SSC) दिली आहे तेथील शाळा सोडल्याचे मूळ प्रमाणपत्र, जर त्याने उच्च शिक्षणाकरिता जमा केलेले असेल तर अलीकडील शाळा/ महाविद्यालय सोडल्याच्या प्रमाणपत्रात, त्याने जेथून माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा दिली आहे त्या जागेचा स्पष्ट उल्लेख आहे.<br>**अथवा**<br>१ उमेदवार ज्या शाळेतून माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (SSC) दिली आहे त्या शाळेच्या नावाचा (पत्त्यासह) स्पष्ट उल्लेख असलेले बोनाफाईड प्रमाणपत्र.<br><br>उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (SSC) दिलेली शाळा, २०११ च्या जनगनणेकडून जाहीर झाल्याप्रमाणे ग्रामीण भागातील असेल तर त्याला गुणाधिक्य दिले जाईल. |

* भारतीय राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र देण्यासाठी खालील कागदपत्रे मान्य केली जातील:

१. उमेदवाराचे राष्ट्रीयत्व " भारतीय" म्हणून दर्शविलेले शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र
२. योग्य प्राधिकाऱ्याने उमेदवाराच्या नावाने दिलेले भारतीय पारपत्र
३. उमेदवाराचे जन्म ठिकाण भारतात आहे असे दर्शविलेले जन्म प्रमाणपत्र

** अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate):

महाराष्ट्र राज्यातील योग्य प्राधिकाऱ्याकडून दिलेले अधिवास प्रमाणपत्र वैध म्हणून विचारात घेतले जाईल. उमेदवाराच्या आईचे अधिवास प्रमाणपत्राच्या पुष्ट्यर्थ विवाह प्रमाणपत्र अथवा नावात बदल झालेला कायदेशीर पुरावा जोडण्यात यावा. अशा उमेदवाराकडून आईच्या नावाचा स्पष्ट उल्लेख असलेले जन्म प्रमाणपत्र जोडावे लागेल.

**पात्रतेसाठीचा अंतिम दिनांक:**

केंद्रीय प्रवेश पध्दतीमधील ऑनलाईन अर्ज भरण्याचा आणि प्रवेश निश्चितीचा अंतिम दिनांक विचारात घेऊन सर्व नियम आणि अटी लागू होण्याच्या सर्व उद्देशांसह, उमेदवाराची पात्रता निश्चित केली जाईल अथवा ठरविली जाईल. विस्तृतपणे असे स्पष्ट केले जाते की, केंद्रीय प्रवेश पध्दतीमधील ऑनलाईन अर्ज भरण्याच्या अंतिम दिनांकापूर्वी या अटी आणि शर्तींनुसार जर उमेदवार अपात्र आढळला आणि अशा अपात्र उमेदवाराने वर उल्लेखिलेल्या अंतिम दिनांकानंतर (म्हणजे ऑनलाईन अर्ज भरण्याची आणि प्रवेश अर्ज निश्चितीचा अंतिम दिनांक) मागणी केलेली पात्रता मिळवल्यास, अशा अंतिम दिनांकानंतर मिळविलेली पात्रता, अपात्र उमेदवाराला कोणत्याही उद्देशासाठी अथवा प्रवेशातील कोणत्याही बाबींसाठी पात्र ठरवू शकत नाही.

**अ ३.३ व्यवसाय प्रशिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजनेसाठी आवश्यक कागदपत्रे:**

प्रवेश निश्चित करण्यासाठी उपरोक्त प्रमाणे नमुद सर्व कागदपत्रे व त्या व्यतिरिक्त खालील कागदपत्रे आवश्यक आहेत:

१. आधार नोंदणी कार्ड
२. प्रशिक्षणार्थ्यांचे नाव समाविष्ट असलेले रेशनकार्ड
३. महाराष्ट्र अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate)
४. पालकांचा उत्पन्नाचा दाखला
५. जातीचा दाखला
६. जात वैधता प्रमाणपत्र
७. दिव्यांग प्रवर्गातिल प्रशिक्षणार्थ्याकरीता वैद्यकीय मंडळाकडून दिलेले अपंगत्वाचे प्रमाणपत्र ज्यात अपंगत्व कायमस्वरुपी असून त्याचे प्रमाण ४०% पेक्षा जास्त आहे असा स्पष्ट उल्लेख आहे.